ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने
शिक्षा अंतिम करणे बाबत.(श्री.मनोज मधुकर गुरव,
तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मढेवडगाव
तालुका श्रीगोंदा)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/९४/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १.या कार्यालयाकडील दोषारोपपत्र क्र-साप्रवि.२/ग्रापं-३/४८१/२०२३, दि.०३/०७/२०२३.
२. या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२१०/२०२४,दि.०३/०५/२०२४
(चौकशी अधिकारी नियुक्ती)
३. सहा.आयुक्त (चौकशी(, नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ/
सी.आर.६५/२०२४, दिनांक- ११/०७/२०२५ (प्राप्त दि.०३.०९.२०२५)
४.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/१८६/२०२५, दि.२१/०१/२०२६
५.श्री.मनोज मधुकर गुरव,तत्का.ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत- मढेवडगाव, ता.
श्रीगोंदा यांचा खुलासा दिनांक १६/०२/२०२६ (प्राप्त दि.०२/०३/२०२६)
६. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम २७ (१)

श्री.मनोज मधुकर गुरव, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत- मढेवडगाव,ता. श्रीगोंदा यांनी ग्रामपंचायत कार्यालीयन कामी गैरवर्तन केले असलेने संदर्भ क्र.१ अन्वये त्यांना दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक ०२ नुसार श्री.मनोज मधुकर गुरव, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांचे गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये खालील प्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत.चौकशी अहवालाचा निष्कर्ष गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| आरोप क्रमांक | विभागीय चौकशी अहवाल निष्कर्ष |
|---|---|
| १ | आरोप सिध्द होतो |
| २ | आरोप सिध्द होतो |

वरीलप्रमाणे श्री.मनोज मधुकर गुरव, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत- मढेवडगाव, ता. श्रीगोंदा यांचे वर ठेवण्यात आलेले ०२ पैकी ०२ आरोप विभागीय चौकशी मध्ये सिध्द झालेले आहे. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शवून विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष पाहता श्री.मनोज मधुकर गुरव यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे.

सबब, श्री.मनोज मधुकर गुरव, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत- मढेवडगाव, ता.श्रीगोंदा महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम २७ (१) नुसार, १०% रक्कम सेवानिवृत्ती वेतनातुन ५ वर्ष कपात करणे याबाबतची नोटीस देण्यात आलेली होती. याबाबतचा नोटीसचा खुलासा संदर्भ क्र.५ नुसार सादर

केलेला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन करण्यात आलेले असुन सदरचा खुलासा प्रशासकीय दृष्टया असमर्थनीय आहे. श्री.मनोज मधुकर गुरव यांचे खुलाश्यांचे अवलोकन करुन त्यांना या आदेशान्वये ०५ टक्के सेवा - निवृत्तिवेतन कपात - ०५ वर्षासाठी करणे. ------------------------ ही शिक्षा अंतिम करण्यात येत असुन या आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०८१८०६०९२३ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-08-2026 22:31:19

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति:-

श्री.मनोज मधुकर गुरव, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत- मढेवडगाव,ता. श्रीगोंदा

व्दारा व प्रत - गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा.

२/- सदरचा आदेश संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.